# राज्याचा खरीप हंगाम २०२०-२० हवामान, पीक पेरणी व पीक परिस्थितीचा अहवाल दि.१२-१०-२०२० अखेर

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोंकण, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते १२ ऑक्टोंबर कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०२४.८ मि.मी. असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत ११०८.५ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०८.१७ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१२.१०.२०१९ अखेर १२२४.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११९.५३ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते १२ ऑक्टोंबर, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | १ | नंदुरबार |
| ४ | ७५ ते १०० % | १० | रायगड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, उस्मानाबाद, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २३ | ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली. |

राज्यात दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकुण ३५५ तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५० %, १९ तालूक्यात ५० ते ७५ %, ८० तालूक्यात ७५ ते १००% तर २५४ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.१२.१०.२०२० अखेर**



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर निळे भुंगेरे, लष्करी अळी, पिवळ्या खोडकिड व गादमाशी या किडींचा तर करपा व कडा करपा या रोगांचा, कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर घाटे अळीचा व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.०९.१०.२०२० अखेरच्या माहे, सप्टेबर, २०२० व ऑक्टोंबर, २०२० मधील अतिवृष्टी / वादळी वारे व पुरामुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या प्राथमिक अहवालानुसार १९ जिल्हयातील माहे सप्टेंबर, २०२० मध्ये ९,६५,०३९ हे., व माहे, ऑक्टोंबर, २०२० मध्ये ३३७ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये भात, भुईमूग, सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी, बाजरी, हळद, ऊस, मका,उडीद, केळी, डाळींब, द्राक्ष, पपई, कांदा, मिरची, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर १४४.९९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.१३%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून १४७.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.२९%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०४.१०.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४२.५६ लाख हे. (९४.२०%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १४१.३३ लाख हे. (९९.५४%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात हळवे व निम गरवे भात पिक दाणे भरणेच्या ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गरवे भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी प्रगतीपथावर आहे. मूग व उडिद पिकांच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. सोयाबीन व भुईमूग पिके शेंगा लागणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. कापूस पिक बोंडे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, पहिल्या वेचणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु झाली आहेत. सुर्यफुल पिक दाणे भरणेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. मका कणसे लागणे, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.१२.१०.२०२० अखेर)**



### खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




### खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)




## रब्बी हंगाम-२०२०-२१

रब्बी हंगामात काही विभागात पुर्वमशागतीची व पेरणीची कामे सुरु झाली आहेत. अहमदनगर, पुणे व सोलापूर जिल्हयात अनुक्रमे-२७८५३ हे., ११६१० हे. व ९८४२ हे. असे एकूण ४९३०५ हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झालेली आहे.

## विभागनिहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर ४.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.५८%) पेरणी झाली आहे. विभागात हळवे व निम गरवे भात पिक दाणे भरणेच्या ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गरवे भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. कडधान्ये व तेलबिया पिके फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला. किड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

## नाशिक विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर २०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.३४%) पेरणी झाली आहे. विभागात गरवा व निम गरवा भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत असून, हळवा भात काढणीचे काम सुरु आहे. नागली पिक फुलोरा ते दाणे लागणेच्या अवस्थेत आहे. मका पिक दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक काढणीच्या अवस्थेत असून सखल भागामध्ये पाणी साचल्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. मूग व उडीद पिके काढणीची कामे पुर्ण होत आली असून, सततच्या पावसामुळे पिकास नुकसान झाले आहे. भुईमूग पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. कापूस बोंडे भरणेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वेचणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल व कारळा पिके फुलोरा अवस्थेत आहेत. बाजरी पिक काढणी अंतिम टप्प्यात आहे. तीळ पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## पुणे विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर १२.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३९.०६%) पेरणी झाली आहे. विभागात मुग व उडीद पिकाची काढणीची कामे पुर्ण झाली आहेत. बाजरी पिक काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. मका पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. भात पिक निसवणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात

झाली आहे. सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत. कापूस पिक फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफूल पिक दाणे भरणेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु झाली आहे.

**किड व रोग –**

विभागात मका व ज्वारी पिकांवर लष्करी अळीचा, तूर पिकावर घाटे अळीचा व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी ज्वारी पिकाच्या पेरणीस सुरुवात झाली असून हरभरा, करडई, सुर्यफुल व मका पिकांच्या पेरणीसाठी पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. तसेच अहमदनगर, पुणे व सोलापूर जिल्हयात अनुक्रमे-२७८५३ हे., ११६१० हे. व ९८४२ हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झालेली आहे.

## कोल्हापूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.६२%) पेरणी झाली आहे. हळवे भात पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत असून, काढणीस सुरुवात झाली आहे. निम गरवे व गरवे भात पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. नागली पिक फुटवे फुटण्याच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी झालेले ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर उर्वरीत पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक दाणे भरणेच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग, उडीद व घेवडा पिकांच्या काढणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत. सोयाबीन, बाजरी व भुईमूग पिकांची काढणीची कामे सुरु आहेत. आडसाली ऊसाची लागणी पुर्ण झाली असून, पिक फुटवे ते वाढीच्या अवस्थेत आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर खोडकिडा व तुडतुडे या किडींचा, ऊस पिकावर हुमणी व लोकरी मावा या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी ज्वारी, मका, करडई, हरभरा पिकांच्या पेरण्या सुरु झाल्या असून, ७०२० हे. क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.

## औरंगाबाद विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर २०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.९७%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची

कामे अंतिम टप्प्यात आहेत. मका पिक पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत. सोयाबीन पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. उडीद व मूग पिकांची काढणीची कामे पुर्ण झाली आहेत. कापूस पिक बोंडे लागणे, बोंडे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु झाली आहेत. भुईमूग पिक शेंगा भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे जवळपास पुर्ण होत आली आहेत. तूर पिक फांदया फुटण्याच्या ते वाढीच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## लातूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर २८.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.८१%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी व बाजरी पिके पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी कणसे काळी पडली आहेत. सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे पुर्ण होत आली आहेत. मका पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे पुर्ण होत आली आहेत. मूग व उडीद पिकांची काढणीची कामे पुर्ण झाली आहेत. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, पहिल्या वेचणीची कामे सुरु झाली आहेत. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## अमरावती विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर ३१.४५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.५४%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु आहेत. मूग व उडीद पिकांची काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा, तूर पिकावर घाटे अळीचा व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी हंगामाकरीता पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत.

## नागपूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.१२ ऑक्टोंबर, २०२० अखेर १९.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.६६%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे ते लोंबी अवस्थेत आहे. कापूस पिक बोंडे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर मका पिक कणसे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक शेंगा भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीस सुरुवात झाली आहे. तीळ पिक फुलोरा ते बोंडे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, गादमाशी व निळे भुंगेरे या किडींचा तर करपा आणि कडा करपा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून आला.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. १२.१०.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

क्षेत्र- हेक्टरमध्ये

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.०४/१०/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १५३६२७१ | १५३४८९० | १०३ | १०० | ० |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २८०८६० | २७५२१९ | ५७ | ९८ | -२ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६८२४९१ | ६२९६९४ | ९४ | ९२ | -८ |
| ४ | रागी | ९४७३१ | ७७१८९ | ७३६३४ | ७८ | ९५ | -५ |
| ५ | मका | ८३८०६० | ८८३६६७ | ८९९८६८ | १०७ | १०२ | २ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ४०९८१ | ३६७१० | ७० | ९० | -१० |
| **खरीप तृणधान्य** | | **३६३६९५६** | **३५०१४५९** | **३४५००१६** | **९५** | **९९** | **-१** |
| ७ | तूर | १२७५९७१ | ११९५४९२ | १२३४७१० | ९७ | १०३ | ३ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३३५९४२ | ४२६३२८ | ८८ | १२७ | २७ |
| ९ | उडिद | ३५८९५३ | ३०७९९५ | ३८९३०९ | १०८ | १२६ | २६ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | ८८५२८ | १२२९०० | १२२ | १३९ | ३९ |
| **एकुण कडधान्य** | | **२२१८५९९** | **१९२७९५७** | **२१७३२४७** | **९८** | **११३** | **१३** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८५५५५५** | **५४२९४१७** | **५६२३२६३** | **९६** | **१०४** | **४** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | १९०९९१ | २०३५२० | १०३ | १०७ | ७ |
| १२ | तीळ | २३६७२ | ११०१८ | ९५०४ | ४० | ८६ | -१४ |
| १३ | कारळ | १९७२७ | ८४१९ | ७३६३ | ३७ | ८७ | -१३ |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १३५१६ | १५२३३ | ८५ | ११३ | १३ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ४०३८१७३ | ४३४८००० | ११२ | १०८ | ८ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | १०६३४ | १०२९६ | ७४ | ९७ | -३ |
| **एकुण तेलबिया** | | **४१५८२६८** | **४२७२७५१** | **४५९३९१५** | **११०** | **१०८** | **८** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४४३०६१४** | **४२८२३९१** | **१०२** | **९७** | **-३** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९७६२४** | **१४१३२७८२** | **१४४९९५६९** | **१०२.१३** | **१०३** | **३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **१२३०६९** | **२२२५०७** | **२४** | **१८१** | **८१** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३२८०३** | **१४२५५८५१** | **१४७२२०७६** | **९७.२९** | **१०३** | **३** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत